प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०६.१०.२०२१**

**कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेकरिता २१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ, कागदपत्रे गोळा करण्यासाठी तसेच कर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी देण्यात आली मुदतवाढ**

सिडको महामंडळाच्या कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी गृहनिर्माण योजनेकरिता अर्जदारांना कर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यास पुरेसा अवधी मिळावा, याकरिता सदर योजनेस मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढ दिल्यामुळे अर्जदारांना अर्ज करण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे गोळा करण्यास पुरेसा अवधी मिळणार आहे. सदर योजनेस २१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अर्जदारांना अनामत रकमेचा भरणा करणे सुलभ व्हावे याकरिता सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांमार्फत कर्जाची सुविध उपलब्ध करून दिली आहे. अधिवास प्रमाणपत्र, कोविड योद्धा प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र इ. कागदपत्रे गोळा करण्यास जाणारा वेळ विचारात घेऊन मुदतवाढ देण्यात आल्याने कोविड योद्ध्यांना अर्जाची प्रक्रिया पूर्ण करण्यास पुरेसा कालावधी मिळणार आहे.

सिडकोकडून १५ ऑगस्ट २०२१ रोजी कोविड योद्धे आणि गणवेषधारी कर्मचारी विशेष गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला असून या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या तळोजा, कळंबोली, खारघर, घणसोली आणि द्रोणागिरी या ५ नोडमध्ये एकूण ४,४८८ घरे (सदनिका) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. एकूण ४,४८८ घरांपैकी १०८८ घरे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तर उर्वरित ३४०० घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता रु. २ लाख आणि सर्वसाधारण प्रवर्गाकरिता रु. २.५ लाख अनामत रक्कम लागू आहे. यापूर्वी, सदर योजनेकरिता ०९ सप्टेंबर २०२१ ही अंतिम मुदत होती. परंतु, अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून योजनेस ०७ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. अनेक अर्जदारांनी कोविड-१९ महासाथ व टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर, अनामत रक्कम भरण्याकरिता काहीतरी व्यवस्था करण्यात यावी, अशी विनंती सिडकोला केली होती. या विनंतीनुसार सिडकोने आपल्या एम्पॅनल्ड बँकांशी संपर्क साधून अर्जदारांना अनामत रक्कम भरण्याकरिता कर्ज पुरवठा करण्याबाबत सुचवले. यानंतर मे. कॅनरा बँक, मे. ॲक्सिस बँक, मे. टीजेएसबी बँक, साउथ इंडियन बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि पीएनबी बँक या बँकांनी अर्जदारांना अनामत रकमेसाठी कर्ज देण्यास संमती दर्शविली. कर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यास आणि कागदपत्रे सादर करण्यास पुरेसा अवधी मिळावा याकरिता अर्जदारांनी केलेल्या विनंतीवरून, सिडकोने सदर विशेष गृहनिर्माण योजनेस २१ ऑक्टोबर २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

एम्पॅनल्ड बँकांचे संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे :

टीजेएसबी बँक - टोल फ्री - १८००२२३४६६, वाशी ब्रँच - ८४५१९८४९५२, सेक्टर-१२ शाखा - ९५९४९५०५७०, सानपाडा - ८४२४०१८९८५, पनवेल - ८३०८९७४६०८, कामोठे - ७२०८९४२२५७

साउथ इंडियन बँक - ८०८९००११२७, ७००८८९७३३१

पीएनबी बँक - ९८०००२४८४०, ७७१०००२२८४, ७२७६५४४८८५, ८८५०५३०८३५, ७६२०००६४८९, ८९२८७९५३४४, ९७६९४९७८७४, ९३०९७३५२५१, ९५०३८६२८३

स्टेट बँक ऑफ इंडिया - ९८७००२४१२७ , ९६१९९९४५४९

सदर बँकांची यादी व संपर्क क्रमांक https://lottery.cidcoindia.com या संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

तथापि, अर्जदार व बँका यांमध्ये या संदर्भात करण्यात येणाऱ्या व्यवहारात सिडकोची कोणतीही भूमिका नसून अर्जदारांनी आपल्या जबाबादारीवर सदर बँकांशी व्यवहार करावा, असे सिडकोकडून कळविण्यात आले आहे.

---

**मा. संपादक महोदय,**
**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

जनसंपर्क विभाग, सिडको